**मुलाखत/रजिष्टर्ड डाकेने पोचपावतीसह**

क्र.अका/आस्था-१/सीआर-३४/१४/कावी/२३१४/१६
जिल्हाधिकारी कार्यालय,गोंदिया
दिनांक :- ६.८.२०१६

प्रति,

श्री.---------------------------------

----------------------------------- पात्र उमेदवार एकूण ३३

विषय :- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, गोंदिया पद कंत्राटी पध्दतीने भरण्यासंदर्भात मुलाखतीस आवश्यक कागदपत्रासह हजर राहण्याबाबत.

संदर्भ :-
१. महसुल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.आव्यप्र-२००७/प्र.क्र.१२५ /आव्यप्र-१, दिनांक २१ जानेवारी, २०१०
२. महसुल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) शासन निर्णय क्रमांक आव्यप्र-२०१६/प्र.क्र.७२/आव्यप्र-१, दिनांक ७.५.२०१६
३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक अका/आस्था-१/सीआर-३४/१४/कावि/२१५१/१६, दिनांक २५.७.२०१६
४. या कार्यालयाचे पत्र क्रमांक अका/आस्था-१/सीआर-३४/१४/कावि/२२०२/१६, दिनांक २९.७.२०१६
५. या कार्यालयाचे दुरध्वनी संदेश दिनांक ३.८.२०१६

--**--

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार **जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, गोंदिया** हे पद तात्पुरते स्वरुपात दिनांक ३१.३.२०१७ पर्यंत ठोक वेतनावर पुर्णपणे कंत्राटी पध्दतीने भरण्यासंदर्भाने दिनांक ३.८.२०१६ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांचे दालनात ठेवण्यात आलेल्या मुलाखतीस आपणास हजर राहण्यास या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ४ अन्वये कळविण्यात आले होते. तदनंतर सदरची मुलाखत दिनांक ९.८.२०१६ रोजी होईल असे या कार्यालयाचे दुरध्वनी संदेश दिनांक ३.८.२०१६ अन्वये आपणास आपले मोबाईलवर कळविण्यात आले होते.

तथापि प्रशासकीय कारणास्तव सदरची मुलाखत पुढे ढकलण्यात आली असुन सदर पदाकरिता मुलाखत दिनांक १०.८.२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल. करिता आपण मुलाखतीस पदाचे शैक्षणिक अर्हतेचे पुर्ततेकरिता आवश्यक मुळ कागदपत्रासह तसेच आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असल्यास अनुभवाचे कागदपत्रासह वेळेवर उपस्थित रहावे. उमेदवारांना मुलाखतीकरिता येण्या-जाण्याच्या कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

(मा.जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार)

(एन.के.लोणकर,निउजि)
जिल्हाधिकारी गोंदिया करिता